क्र. १२१ पहिले वर्ष

२५ डिसेंबर २०२२

# रविवारची उपासना

## ख्रिस्तजन्मोत्सव (नाताळचा सण)

### प्रस्तावना

बेथलेहेमाच्या गोठ्याभोवती बाळ येशूला पाहण्यासाठी जमलेल्या भाविकांनो, त्या महान ख्रिस्तजन्माच्या रात्री येशूचे दर्शन घेण्यासाठी देवाकडून आमंत्रण मिळालं ते फक्त त्या थंडीत कुडकुडत, जगण्यासाठी, शेकोटीची ऊब घेणाऱ्या माळरानावरच्या गरीब धनगरांना. त्यावेळी बेथलेहेमच्या वाड्या-महालामध्ये ऐश आरामात राहणाऱ्या धनिकांना नव्हे, तर धनगरांना आणि ते आमंत्रण देखील स्वर्गातील दुतांकडून का? त्यांची अशी कोणती पुण्याई होती की त्यांना देवानं आमंत्रण द्याव. माणसं वरपांगी वैभव पाहतात. परमेश्वर अंत:करणाचं वैभव शोधतो. राजांचा राजा, पृथ्वीवरील त्यांच्या पहिल्या-वहिल्या दरबारासाठी वैभव दिसले ते फक्त त्या गरीब धनगरांना, कारण ते हृदयानं गरीब व नम्र होते.

भाविकांनो, आज आपण बेथलेहेमाच्या गोठ्याभोवती बाळ येशूचे दर्शन घेण्यासाठी जमलो आहोत. आपणाला त्या राजांचा राजाच्या दरबारामध्ये आमंत्रणदेखील मिळाले आहे. पण आपण आमंत्रितांची वस्त्रे परिधान केलेली आहेत का? आपण आपल्या हृदयात डोकावून पाहू या आणि आपण चुकले असल्यास देवाकडे क्षमा मागून त्याच्या दर्शनासाठी या मिस्साबलिदानात प्रार्थना करू या त्याचे आमंत्रण स्वीकारण्यास स्वत:ला लायक बनवून आमंत्रितांची वस्त्रे परिधान करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, आमचा प्रकाश प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या तेजाने तू ही पवित्र रात्र प्रकाशित करतोस. प्रभू व जगाचा खरा प्रकाश म्हणून आम्ही त्याचे स्वागत करतो. त्याच्या स्वर्गराज्यात आम्हांला शाश्वत आनंदाचे वरदान मिळो. तेथे तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, एकच परमेश्वर असून, सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

### पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन** ९:२-७

**"आम्हास पुत्र दिला आहे."**

अंध:कारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे. मृत्युछायेच्या प्रदेशात बसणाऱ्यांवर प्रकाश पडला आहे. तू राष्ट्रांची वृध्दी केली आहे. त्याला महानंदप्राप्ती करून दिली आहे. हंगामाच्या उत्सवसमयी करावयाच्या आनंदाप्रमाणे, लूट वाटून घेणाऱ्या लोकांच्या आनंदाप्रमाणे ते तुझ्यासमोर आनंद करतात. कारण मिद्यानाच्या दिवसाप्रमाणे तू त्याच्या भाराचे जू, त्याच्या खांद्यावरची काठी, त्याच्यावर जुलुम करणाऱ्यांचा सोटा मोडला आहे. युध्दाच्या गर्दीत जोडे घातलेल्या योध्याचे जोडे व रक्ताने भरलेली वस्त्रे ही जाळण्यासाठी अग्नीला सरपण झाली आहेत. कारण आम्हासाठी बाळ जन्मला आहे. आम्हास पुत्र दिला आहे. त्याच्या खांद्यावर सत्ता राहील. त्याला अद्भूत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील. त्याच्या सत्तावृध्दीला व शांतीला अंत नसेल. तो दाविदच्या सिंहासनावर बसून त्याचे साम्राज्य चालवील आणि तेथून पुढे ते सर्वकाळ न्यायाने व धर्माने दृढ व स्थिर करील. सेनाधिश परमेश्वराचा आवेश हे सिध्दीस नेईल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

९५:१-३,११-१३

प्रतिसाद : **आमच्यासाठी आज तारणारा जन्मास आला आहे.**

१. परमेश्वराचे गुणगान नवे गीत गाऊन करा. हे सर्व पृथ्वी, परमेश्वराचे गुणगान कर. त्याच्या नामाला धन्यवाद द्या (प्र.)

२. त्याने केलेल्या तारणाची प्रतिदिनी घोषणा करा. राष्ट्रांमध्ये त्याचा गौरव, सर्व लोकांमध्ये त्याची अद्भुत कृत्ये जाहीर करा. (प्र.)

३. आकाश हर्षो, पृथ्वी उल्हासो, समुद्र व त्यातील सर्व काही गर्जना करोत. जमिन व त्यातील सर्व काही उत्सव करोत. वनातील सर्व झाडे परमेश्वरासमोर आनंदाचा गजर करतील. (प्र.)

४. कारण तो आला आहे. तो पृथ्वीचा न्यायनिवाडा योग्यप्रकारे करील; लोकांचा न्याय सत्यतेने करील. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलने तीताला लिहिलेल्या पत्रातून घेतलेले वाचन २:११-१४**

**"सर्व माणसांना तारण देणारी देवाची कृपा प्रगट झाली आहे."**

सर्व माणसांना तारण देणारी देवाची कृपा प्रगट झाली आहे. तो आम्हांला असे शिकवतो की, भाग्यशाली आशाप्राप्तीची म्हणजे आपला थोर देव व तारणारा असा जो येशू ख्रिस्त त्याचे गौरव प्रगट होण्याची वाट पाहत आपण अभक्तीला व ऐहिक वासनांना नाकारुन आजच्या युगात मर्यादेने, नीतीने, सुभक्तीने वागावे. त्याने स्वत:ला आम्हाकरिता दिले, यासाठी की, त्याने खंडणी भरून आम्हांला सर्व स्वैराचारापासून मुक्त करावे आणि चांगल्या कामात तत्पर असे आपले स्वत:चे लोक आपणासाठी शुध्द करून ठेवावे.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

लूक २:१०-१२

**आलेलुया, आलेलुया!**
मोठ्या आनंदाची सुवार्ता मी तुम्हांस सांगतो.
आम्हांसाठी आज तारणारा जन्मला आहे;
तो ख्रिस्त प्रभू आहे.
**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत लूकच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** २:१-१४

**"तुम्हांसाठी आज तारणारा जन्मला आहे."**

सर्व जगाची नावनिशी लिहिली जावी अशी कैसर औगुस्त ह्यांची आज्ञा झाली. क्विरीनिय हा सुरियाचा सुभेदार असताना ही पहिली खानेसुमारी झाली. तेव्हा सर्व लोक आपआपल्या गावी नावनिशी लिहून द्यावयास गेले. योसेफ हा दाविदच्या घराण्यातला व कुळातला असल्यामुळे तोही गालिलातील नाझरेथ गावाहून वर यहुदियातील दाविदच्या बेथलेहेम गावी गेला व त्याला वाग्दत्त झालेली मरीया गरोदर असताना तिलाही त्याने नावनिशी लिहून देण्यासाठी बरोबर नेले. तेथे असताना असे झाले की, तिचे दिवस पूर्ण भरले आणि तिला प्रथमपुत्र झाला. त्याला तिने बाळंत्याने गुंडाळून गव्हाणीत ठेवले, कारण त्यांना उतारशाळेत जागा नव्हती.

त्याच परिसरात मेंढपाळ रानात राहून रात्रीच्यावेळी आपले कळप राखत होते. तेव्हा प्रभूचा दूत त्यांच्याजवळ उभा राहिला. प्रभूचे तेज त्यांच्याभोवती प्रकाशले आणि त्यांना मोठी भीती वाटली. तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, भिऊ नका, कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांस होणार आहे त्याची

सुवार्ता मी तुम्हांस सांगतो; ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे. तो ख्रिस्त प्रभू आहे आणि तुम्हांस खूण ही की, बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत ठेवलेले एक बालक तुम्हांस आढळेल. इतक्यात स्वर्गातील सैन्याचा समुदाय त्या देवदूताजवळ अकस्मात प्रकट झाला आणि देवदूत देवाची स्तुती करीत म्हणाले,

''उर्ध्वलोकी देवाला गौरव,
आणि पृथ्वीवर ज्यांच्यावर
त्याचा प्रसाद झाला आहे
त्या मनुष्यास शांती.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :** हे सर्व शक्तिमान परमेश्वरा, आज ख्रिस्ताची जयंती साजरी करीत असताना आमच्या हृदयसिंहासनावर आम्ही ख्रिस्त प्रभूला कायमचे विराजमान करावे, ही कृपा आम्हांला दे.

प्रत्येक विनंतीनंतर आपला प्रतिसाद असेल – **करितो मी याचना ऐकावी प्रार्थना. (गायनात)**

१. ख्रिस्त आपणा प्रत्येकासाठी व जगातल्या प्रत्येक माणसासाठी शांतीची सुवार्ता घेऊन आज पृथ्वीतलावर पदार्पण करीत आहे. ही शांतीची सुवार्ता प्रत्येक माणसापर्यंत पोहचविण्यासाठी परमेश्वराने एक साधन म्हणून ख्रिस्तसभेचा वापर करावा म्हणून आपण बाळ येशूकडे प्रार्थना करू या.

२. देवाच्या हृदयात प्रवेश मिळतो तो फक्त नम्र व हृदयाच्या धनवान व्यक्तींना. परमेश्वराने आपणा सर्वांना नम्र व मनानं धनवान बनण्याच दान द्याव म्हणून आपण आज विशेष प्रार्थना करू या.

३. हा थंडीचा मोसम आहे. काही ठिकाणी अनेक माणसं थंडीने कुडकुडत जीवंत राहण्यासाठी धडपडत आहेत. अनेक माणसं मायेच्या उबेसाठी आसरा शोधीत आहेत. परमेश्वराने त्यांना मायेचे उबदार अंथरूण घालावं म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपण आज या सणाच्या मेजवानीच्या पंचपक्वानाचा यथेच्छ आस्वाद घेणार आहात. आपण या सणाची मौजमजा करीत असताना अनेक माणसं भूकेनं मरत आहेत, असाध्य आजारानं निराशेच्या खाटेवर दु:ख भोगत आहेत. परमेश्वरानं त्यांना प्रेमाचा स्पर्श व स्वर्गीय आशावाद त्यांच्यात सतत तेवत ठेवावा म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपले परमगुरूस्वामी पोप फ्रान्सिस आपले आध्यात्मिक मेंढपाळ बिशप व आपल्या धर्मप्रांतात कार्य करत असलेले सर्व धर्मगुरू, धर्मबंधू व धर्मभगिनी यांच्यासाठी विशेष प्रार्थना करू या.

६. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रभो, परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमवता मरीयेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तारणाच्या आनंददायी उत्सवाच्या दिवशी आमच्या ह्या दानांचा स्वीकार कर. ह्या दानांमुळे मनुष्य देहधारी देवपुत्राशी आमचे ऐक्य घडवून आण. तो आमचे जीवन तुझ्या जीवनाशी जोडत असतो. आमचे जीवन त्याच्या जीवनाप्रमाणे व्हावे म्हणून आम्हांला साहाय्य कर. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे आमच्या परमेश्वर बापा, मुक्तिदात्याच्या जन्माने आम्ही आनंदित झालो आहोत. त्याच्या शिकवणीप्रमाणे आचरण करून त्याच्या जीवनात सहभागी होण्यास आम्हांला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

प्रभूजन्माचा सोहळा आपल्याला तीन महत्त्वाच्या गोष्टींवर चिंतन करण्याचे आवाहन करतो :

**अ) मशिहा आणि त्याचे राज्य :** आजचे पहिले वाचन मसिहासाठी अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता आणि शांतीचा राजपुत्र अशी चार बिरूदे वापरते (यशया ९:१-७). त्याद्वारे तो बौध्दिक, धार्मिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या सर्वांग परिपूर्ण असेल, असे सुचविण्यात आलेले आहे. तसेच त्याच्या राज्यासाठी प्रकाश (निराशेवर मात करणारे राज्य), हंगामाचा आनंद (कष्टाचे फळ देणारे राज्य), लुटीची विभागणी करणाऱ्यांचा आनंद (शत्रूंना चीत करणारे राज्य) आणि युध्दापासून मुक्ती (शांतीचे राज्य) अशा प्रतिमा वापरण्यात आलेल्या आहेत.

**ब) पापापासून पावित्र्याकडे केलेला प्रवास :** आजचे दुसरे वाचन (तीत.२:११-१४). तीताला व समस्त मानवजातीला आठवण करून देते की, प्रभू येशूच्या जन्माद्वारे देवाची तारणदायी कृपा मनुष्यजातीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे येशूच्या प्रकाशमय राज्यात जीवन जगायचे असेल तर पापाचा अंधार सोडून देण्याची तयारी असायला हवी, असे संत पौल सुचवितो.

**क) आध्यात्मिक प्रवासातील अडथळ्यांवर मात :** आजच्या शुभवर्तमानात योसेफ आणि मरीया सर्व प्रकारचे अडथळे दूर सारून येशू बाळाच्या जन्माची तयारी करतात. मेंढपाळ काळोख व थंडी ह्या अडथळ्यांवर मात करीत बेथलेहेमच्या गोठ्यापर्यंत पोहोचतात. नाकारलेपणामुळे झालेली मानहानी, पापाचा काळोख आणि उदासीनता/निष्क्रियतेची थंडी यावर त्या सर्वांनी मात केली.

**आत्मपरीक्षण :** प्रभूजन्माचा आनंद साजरा करण्यासाठी मी कोणत्या प्रकारची आध्यात्मिक मनोवृत्ती धारण केलेली आहे? ●●●

| डिसेंबर २०२२ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २६ | सं स्तेफान (तां) | : प्रे.कृ. ६:८-१०, ७:५४-५१/मत्तय १० :१७-२२ |
| मंगळ २७ | सं योहान (प्रेषित) (पां) | : १ योहान १ : १-४/योहान २०:२-८ |
| बुध २८ | निष्पाप पवित्र बालक (तां) | : १ योहान १:५-२:२/मत्तय २:१३-१८ |
| गुरु २० | सं थॉमस बेकेट (पां) | : १ योहान २:३-११/लूक २:२२-३५ |
| शुक्र ३० | पवित्र कुटुंब (पां) | : प्रवक्ता ३:३-७, १४-१७/ मत्तय २:१३-२३ |
| शनि ३१ | सं सिल्व्हेस्टर पहिले (पां) | : १ योहान २:१८-२१/ योहान १:१-१८ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)